पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- २९/०२/२०२०

## अतिदुर्गम मौजा कियर येथे भव्य जनजागरण मेळावा संपन्न

मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री. शैलेश बलकवडे सा़ो., मा. अपर पोलीस अधिक्षक, गडचिरोली श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग सा़ो., मा. अपर पोलीस अधिक्षक, (अभियान) श्री. बन्सल सा़ो., मा. अपर पोलीस अधिक्षक, श्री. मनीष कलवानीया सा़ो., मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री. कुणाल सोनवणे सा़ो. यांचे मार्गदर्शनाखाली नक्षलदृष्ट्या अतिसंवेदनशिल मौजा कियर येथे भव्य जनजागरण मेळावा घेण्यात आला.

सदर मेळाव्याचे प्रमुख पाहुणे म्हणुन सिआरपीएफचे डेप्युटी कमांडट श्री. संजय पुनीया सा़ो., सिआरपीएफचे सिएमओ श्री. डॉ. एम. संपत सा़ो., श्री. एस.एम. झाडे सा़ो., पोउपनि श्री. इंद्रजीत पासवान, आरोग्य अधिकारी, श्री. रत्नदिप दुधे, अमोल मोकड, प्रकल्प कार्यालयाचे अधिकारी, श्री. रितेश कुळसंगे सा़ो., श्री. आलाम सर जि.प.प्राथ.शाळा कियर तसेच गावातील प्रतिष्ठीत नागरीक उपस्थित होते.

मेळाव्यामध्ये नागरीकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. पोनि/संदिप भांड सा़ो. यांनी नक्षल गावबंदी व नक्षल सरेंडर पॉलीसी बाबत माहिती देवुन जास्ती जास्त नक्षल सरेंडर होणेबाबत आवाहन केले. आरोग्य विभाग भामरागड व सिआरपीएफ ३७ बटालीयन चे श्री. डॉ. एम. संपत सा़ो., यांनी उपस्थित नागरीकांची आरोग्य तपासणी करुन जागीच मोफत औषधी दिले. गावातील लोकांना भामरागड पोलीस स्टेशन तर्फे समाजोपयोगी वस्तु भांडे, शाळेतील विद्यर्थी-विद्यर्थ्यांना वही, पेन्सील, शॉपनरचे वाटप करण्यात आले. तसेच सिआरपीएफ ३७ बटालीयन कडुन ब्लॉकेट, बि-बियाने देण्यात आले.

त्याचप्रमाणे जि.प.प्राथ.शाळा कियर व कारमपल्लीसाठी प्रत्येकी ०१ नग आलमारी व पुस्तकांचा सट देण्यात आले. पोलीस स्टेशन कडुन लहान मुलांना चॉकलेट व तरुणांना व्हालीबॉल नेट व व्हालीबॉल वाटप करण्यात आले.

सदर मेळाव्यात मौजा कियर परिसरातील ४०० ते ५०० स्त्रि - पुरुष हजर होते. उपस्थित नागरीकांना जेवनाची व्यवस्था करण्यात आली. कार्यक्रमाची प्रास्तावीक पोनि/संदीप भांड यांनी केले. व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पोउपनि मंगेश कराडे यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी भामरागड पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.



सी.आर.पी.एफ.
आयोजित
गडचिरोली जिल्हा
स्थळ : कियर
Shot on OnePlus